THE TIMES OF INDIA GROUP

महाराष्ट्र टाइम्स

A Marathi Daily Published by The Times Of India Group

The Times of India Bldg 2nd Floor, Maharashtra Times. Dr. D. N. Road., Fort, Mumbai – 400001 Tel: 022-66354231 Fax No. 22731175

मा. प्राचार्य,

डॉ. राजपाल हांडे, मिठीबाई कॉलेज

विषय - मटा नवरंग २०१७ या उपक्रमात आपल्या कॉलेजमधील सर्वोत्तम विद्यार्थीनीला संधी देण्याबाबत

महोदय/महोदया

दरवर्षी मोठ्या उत्साहात नवरात्रौत्सव साजरा केला जातो. या उत्सवात 'मटा नवरंग' या उपक्रमाने वेगळाच रंग भरला आहे याची कल्पना आपल्याला असेलच. महाराष्ट्र टाइम्स आणि मुंबईतील सर्व कॉलेजांचे नेहमीचेच असलेले स्नेहाचे संबध आणखी दृढ करण्याची संधी या उत्सवाने प्राप्त करून दिली आहे. नवरंगांमधील त्या दिवसाचा रंग दरवर्षी एका प्रसिद्ध अभिनेत्रीचा फोटोच्या माध्यमातून मटाच्या मुख्य अंकात दिला जात असे. यात थोडा बदल करून गेल्या दोन वर्षापासून मटाने एक पाऊल पुढे टाकत कॉलेज विद्यार्थीनींना या लोकप्रिय अभिनेत्रींसोबत झळकण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे. त्यात आपले कॉलेज उत्साहाने सहभागी झाले याचा आम्हाला आनंद आहे. यंदाही आपल्या कॉलेजने या उपक्रमात सहभागी व्हावे यासाठी हे पत्र. मॉडेलिंग किंवा मनोरंजन क्षेत्रात करिअर करण्याच्या दिशेने वाटचाल करीत असलेल्या किंवा त्या दिशेने पाऊल टाकलेल्या आपल्या कॉलेजमधील विद्यार्थीनीचा फोटो आपण मटासोबत शेअर करावा अशी विनंती. विविध कॉलेजांमधून येणाऱ्या फोटोंमधून सर्वोकृष्ट नऊ विद्यार्थीनींना या उपक्रमांतर्गत विविध अभिनेत्रीसोबत मटामध्ये झळकण्याची संधी मिळेल. आपल्या कॉलेजकडून नेहमीप्रमाणेच योग्य ते सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आहे. धन्यवाद.

अशोक पानवलकर

मुख्य संपादक, महाराष्ट्र टाइम्स